महा मेट्रो

PUNE METRO

## पुणे महानगरपालिका क्षेत्रात पहिल्यांदा मेट्रो ट्रेन धावली



**दिनांक ३० जुलै २०२१:** मा. उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रथमच धावणाऱ्या मेट्रो ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून मेट्रो ट्रेनच्या चाचणीची सुरुवात केली. वनाझ ते रामवाडी या मार्गिकेमध्ये, वनाझ ते आयडियल कॉलनी या मार्गावर हि 'ट्रायल रन' घेण्यात आली. ३ कोच असलेली मेट्रो ट्रेनची ट्रायल रन वनाझ ते आयडियल कॉलनी येथे यशस्वीरीत्या पार पडली. लवकरच मेट्रो ट्रेनची चाचणी गरवारे स्थानकापर्यंत टप्याटप्याने घेण्यात येईल. वनाझ ते गरवारे या प्राधान्य मार्गाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून लवकरच हा मार्ग प्रवाश्यांसाठी खुला करण्यात येईल.

याप्रसंगी पुणे मेट्रोसाठी तयार होणाऱ्या कोच प्रतीकृतीचे देखील अनावरण करण्यात आले. पुणे मेट्रोसाठी बनविण्यात आलेली ट्रेन अत्याधुनिक असून जागतिक दर्जाची आहे. त्यामध्ये महिलांसाठी नामनिर्देशित राखीव जागा असणार आहेत. पुणे मेट्रोचे कोच हे अलुमिनियम या धातूपासून बनविण्यात येणार असल्याने वजनाने हलके व ऊर्जेची बचत करणारे असणार आहेत. पुणे मेट्रोसाठी धावणाऱ्या ट्रेनची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी हिल व्हिव पार्क डेपो (वनाझ) आणि कृषी महाविद्यालयाच्या जवळ मेट्रो कार शेड डेपो बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. आजमितीस दोन्ही डेपोचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे.






पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, जिल्हा प्रशासन, पोलीस, राज्य शासन व केंद्र शासन यांच्या सहयोगामुळे आणि पुणेकरांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे पुणे मेट्रोचे आजमितीस ६० टक्के काम पूर्ण केले आहे. कोरोना काळात सर्व प्रकारची काळजी घेऊन पुणे मेट्रोने अत्यंत आव्हानात्मक स्थितीत काम चालू ठेवले आणि त्यामुळेच आतापर्यंतची प्रगती साधता आली.

या प्रसंगी मुख्य अतिथी मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हंटले आहे की, "पुणे मेट्रोचे काम वेगाने सुरु असून हा प्रकल्प पुणेकरांसाठी अत्यंत फायद्याचा ठरणार आहे. सशक्त अश्या मेट्रोमार्गामुळे पुण्याचे नाव जागतिक दर्जाच्या शहरांमध्ये स्थान मिळवणार आहे. मेट्रोमुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट होणार असून यामुळे

प्रदूषणाला आला बसण्यास मदत होणार आहे. मेट्रोसाठी सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल व काहीही कमी पडू देणार नाही. अनेक प्रकारची विकासकामे भविष्यात शहरासाठी प्रस्तावित केली आहेत."

कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील द्रुकश्राव्य माध्यमातून सहभागी होते. ते म्हणाले, "पंतप्रधान मोदी, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेट्रो प्रकल्प सुरू झाला. कोरोनामुळे खीळ बसेल असे वाटले होते, मात्र मुख्यमंत्री ठाकरे, ऊपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाठपुरावा ठेवला. अधिकारी, कर्मचारी यांनी अडथळे दूर करत काम केले".

महापौर मोहोळ म्हणाले, "राज्यातील सर्वात मोठी महापालिका पुणे आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत मेट्रोचा मोठा वाटा असेल. पुण्याला ही संधी मिळवून देण्यात सर्वांचाच सहभाग आहे. या वर्षाअखेरीस पुणेकर मेट्रो मधून प्रवास करू शकणार आहेत."

श्रीमती नीलमताई गोर्हे म्हणाल्या, "जमीनीवरून की भूयारी या वादात अडकलेली मेट्रो पुण्यात अखेर सुरु झाली. पुण्यातील विलंबाची कसर या कामातून भरून निघाली. महिलांसाठी मेट्रो खास सुरक्षित सेवा आहे".

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी या प्रसंगी राज्य शासन, केंद्र शासन, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणेकर आणि पिंपरी-चिंचवडकर यांच्या सहयोगाचे आभार मानले. पुण्यातील पहिल्या ३ किलोमीटरची चाचणी घेताना अभिमान वाटतो असे ते म्हणाले. ३ वर्षात काम पुर्ण झाले. त्यातले एक वर्षे कोरोनातच गेले. मेट्रो कामाचा त्रास सहन करत असल्याबद्दल दीक्षित यांनी पुणेकरांना धन्यवाद दिले.

या कार्यक्रमास आमदार सिद्धार्थ शिरोळे, पुणे महानारपालिकेचे सभागृह नेते गणेश बीडकर, विरोधी पक्ष नेत्या श्रीमती दीपाली धुमाळ, वनाझ ते आयडियल कॉलोनी या मार्गिकेवरील नगरसेविका श्रीमती अल्पना वरपे, श्रीमती श्रद्धा प्रभुणे, श्रीमती हर्षली माथवड व पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख हे उपस्थित होते. यांच्या व्यतिरिक्त पुण्याचे राज्यसभेचे खासदार प्रकाश जावडेकर, लोकसभेचे खासदार गिरीश बापट, आमदार व भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी द्रुकश्राव्य माध्यमातून आपल्या शुभेच्छा पुणे मेट्रोला कळविल्या आहेत.


पुणे महानगरपालिका क्षेत्रातील पूर्व–पश्चिम वनाज ते रामवाडी
पुणे मेट्रोच्या प्रथम
शुभहस्ते
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन
शुक्रवार, दि. ३० जुलै २०२१ रोजी स. ७ वाजता
सन्माननीय उपस्थिती
श्री. एकनाथ शिंदे
श्री. मुरलीधर


Pune
TRAIN CARS


पुणे महानगरपालिका क्षेत्रातील पूर्व–पश्चिम वनाज ते
पुणे मेट्रोच्या प्रथम
महा मेट्रो
PUNE METRO
दि. ३० जुलै २०२१ रोजी स. ७
मा. श्रीमती डॉ. नीलम गोऱ्हे
उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद
श्री. मुरलीधर मोहोळ
महापौर, पुणे महानगरपालिका
श्री. प्रकाश जावडेकर
खासदार, राज्यसभा


पुणे महानगरपालिका क्षेत्रातील पूर्व–पश्चिम वनाज ते
पुणे मेट्रोच्या प्रथम
महा मेट्रो
PUNE METRO
शुक्रवार, दि. ३० जुलै २०२१ रोजी स. ७
मा. श्रीमती डॉ.